

'दर्पण' या पहिल्या मराठी वृत्तपत्राचे संपादक
**बाळशास्त्री जांभेकर**
यांना जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन
-पत्रकार दिन-


महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक - रवींद्र घोडविंदे

Rs.2/-

सोमवार ❖ ०६ जानेवारी २०२५ ❖ वर्ष ६ ❖ अंक - १९२ ❖ पाने - ४ RNI NO : MAHMAR/2016/72091 Postal Reg. No. THC/256/2022-2024


## मुंबई महापालिका निवडणुकीसाठी भाजपची तयारी



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** मुंबई महानगरपालिकेच्या आगामी निवडणुकीसाठी भाजपने तयारी सुरू केली असून भाजपचा बालेकिल्ला असलेल्या उत्तर मुंबईतून भाजपचे ४० नगरसेवक निवडून आणण्याचा निर्धार खासदार आणि केंद्रीय मंत्री पियुष गोयल यांनी व्यक्त केला. सध्या राज्यात डबल इंजिन सरकार असून महापालिका निवडणुकीनंतर ट्रिपल इंजिन सरकार आणून मुंबईचा विकास करणार, त्यासाठी महापालिकेची निवडणूक लवकर होईल, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

उत्तर मुंबई लोकसभा मतदारसंघातील विविध कामांचा आढावा घेण्यासाठी पियुष गोयल यांनी शनिवारी पालिका मुख्यालयात एका संयुक्त बैठकीचे आयोजन केले होते. या बैठकीला मुंबई महापालिका, म्हाडा, एसआरए, एमएमआरडीए, एमएसआरडी, जिल्हाधिकारी आदी विविध प्राधिकरणांचे प्रतिनिधी उपस्थित होते. पालिका आयुक्त भूषण गगराणी आणि एमएमआरडीएचे आयुक्त संजय मुखर्जी यांच्या उपस्थितीत ही बैठक पार पडली. या बैठकीला उत्तर मुंबईतील कांदिवलीचे भाजपचे आमदार अतुल भातखळकर, दहिसरच्या मनीष चौधरी, तसेच माजी नगरसेवकही उपस्थित होते. या बैठकीत उत्तर मुंबईतील विविध पायाभूत सुविधा प्रकल्पांचा आढावा घेण्यात आला. दहिसर, बोरिवली, कांदिवली, मालाड दरम्यानच्या या मतदारसंघातील आरोग्य, शिक्षण, पायाभूत सुविधा यांच्याशी संबंधित सर्व प्रकल्पांना गती देण्याच्या दृष्टीने या बैठकीत चर्चा करण्यात आली. गोयल खासदार झाल्यापासून गेल्या पाच महिन्यांतील ही तिसरी बैठक होती. उत्तर मुंबईला उत्तम मुंबई करण्याचे आमचे लक्ष्य असल्याचे यावेळी गोयल यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितले.

### ६० हजार कोटींची कामे

उत्तर मुंबई मतदारसंघात विविध प्राधिकरणांची तब्बल ६० हजार कोटींची कामे सुरु असून येत्या काही वर्षांत उत्तर मुंबईचा कायापालट होणार आहे. मुंबई बाहेरून येणाऱ्या नागरिकांनाही या सोयी - सुविधांचा लाभ मिळेल, असेही ते म्हणाले. लोखंडवाला डीपी रोड, मालाड डेव्हलपमेंट प्रोजेक्ट, डेव्हलपमेंट प्लेग्राऊंड, स्वच्छता मोहीम, पर्यटनस्थळांची ओळख आणि विकासासाठी नियोजन, १०० स्वयं-सहाय्यता गटांना प्रशिक्षण देण्यासाठी उपक्रम, कोळी समाजासाठी विशेष कार्यशाळेचे आयोजन, सांस्कृतिक केंद्र उभारणी, बोरिवली (पूर्व) येथे वाहनतळ निर्माण करणे, आरोग्य सेवा सुधारण्यासाठी उपाययोजना, संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील बुद्ध पुतळ्याबाबत अभ्यास आणि योजना, पोईसर नदी रुंदीकरण, पुनर्वसन इत्यादी विषयांवर विस्तृत चर्चा करण्यात आली. उत्तर मुंबईतील विकास योजनांमध्ये पुनर्विकास, पायाभूत सुविधांमध्ये वाढ, नागरी सुविधा, वाहतूक व्यवस्थापन, सार्वजनिक सेवा, टोल प्लाझा, शहर सुशोभीकरण आणि प्रदूषण नियंत्रण आदींचा समावेश आहे.

## राज्यात भ्रष्टाचाराचे सातशेहून अधिक गुन्हे!

### नाशिक अग्रस्थानी तर मुंबई सर्वात कमी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : लाच घेतल्याप्रकरणी राज्याच्या लाच लुचपत प्रतिबंधक विभागात दाखल होणाऱ्या गुन्ह्यांच्या संख्येत कमालीची घट झाल्याचे आकडेवारीवरून दिसून येत आहे. यंदा राज्यात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने भ्रष्टाचारप्रकरणी ७१३ गुन्हे नोंदवले आहेत. नाशिकमध्ये सर्वाधिक तर मुंबईत आश्चर्यकारकरीत्या कमी गुन्हे नोंदवले गेले आहेत. ७१३ पैकी ६७८ गुन्हे प्रत्यक्षात लाच घेतल्याप्रकरणी तर ३१ गुन्हे बेहिशेबी संपत्ती गोळा केल्याप्रकरणी आहेत. राज्यातील लाचेच्या ६७८ गुन्ह्यांत ९९३ जणांना अटक करुन तीन कोटी १८ लाखांची लाचेची रक्कम हस्तगत करण्यात आली. यामध्ये सर्वाधिक लाचखोर महसूल विभागातील असून १८० गुन्ह्यांत २५२ जणांना अटक करण्यात आली. या खालोखाल पोलिसांचा (१३७) क्रमांक लागतो. प्रथम श्रेणीतील ६२, द्वितीय श्रेणीतील १०१ तर तृतीय व चतुर्थ श्रेणीतील अनुक्रमे ५१० व ४७ तसेच इतर १०४ लाचखोरांचा समावेश आहे.

२०१४ मध्ये राज्यात भ्रष्टाचारप्रकरणी १३१६ गुन्हे दाखल झाले होते. तेव्हापासून दरवर्षी गुन्ह्यांच्या संख्येत घट झाली आहे. २०१५ मध्ये १२७९, २०१६ मध्ये १०१६, २०१७ मध्ये ९२५, २०१८ व २०१९ मध्ये अनुक्रमे ९३६ आणि ८९१ गुन्ह्यांची नोंद झाली. २०२० मध्ये करोना काळात गुन्हे नोंद होण्यात कमालीची घट झाली. त्यावेळीही ६६३ गुन्हे नोंदवले गेले. २०२१ मध्ये ७७३, २०२२ मध्ये ७४९ तर गेल्या वर्षी २०२३ मध्ये ८१२ गुन्ह्यांची नोंद झाली. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या संकेतस्थळावर ही माहिती उपलब्ध आहे.

नाशिकमध्ये सर्वाधिक १५२ गुन्ह्यांची नोंद झाली असून या अंतर्गत २३४ जणांविरुद्ध कारवाई करण्यात आली आहे. त्या खालोखाल पुण्याचा क्रमांक लागतो. पुण्यात १४९ गुन्ह्यांत २२३ जणांविरुद्ध प्रत्यक्ष लाचप्रकरणी कारवाई करण्यात आली आहे. मुंबईत भ्रष्टाचाराचे फक्त ३९ गुन्हे नोंदवून ५४ जणांना अटक करण्यात आली. ठाणे (७३), नागपूर (६२), अमरावती (६८), संभाजीनगर (११२) या शहरात एकूण ४१९ जणांना अटक करण्यात आली.



### पालघरच्या माजी नगराध्यक्षांसह

## मुंबईतील उद्धव सेनेच्या पदाधिकाऱ्यांचा शिंदेसेनेत प्रवेश

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे - गेल्या अडीच वर्षात राज्यात जी विकासकामे झाली, त्याच विकासकामांना लोकांनी पसंती दिली. त्यांनी धनुष्यबाण आणि शिवसेनेवर शिक्कामोर्तब केले. विधानसभा निवडणूकीत महायुतीचे २०० पेक्षा अधिक आमदार निवडून आले. यातूनच जनतेने विरोधकांची तोंडे बंद केली. त्यांना कायमचे घरी बसविले.त्यामुळेच उद्धव सेनेचे नवी मुंबईचे जिल्हाप्रमुख द्वारकानाथ भोईर यांच्यासह अनेकांनी शिंदे सेनेत प्रवेश केल्याची माहिती राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी रविवारी दिली.

ठाण्यातील आनंदआश्रम या टेंभी नाक्यावरील शिवसेना कार्यालयात उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या उपस्थितीमध्ये उद्धव सेनेच्या अनेक पदाधिकारी आणि माजी नगरसेवकांनी शिंदे सेनेत प्रवेश केला. त्यावेळी या पदाधिकाऱ्यांचे स्वागत केल्यानंतर शिंदे यांनी माध्यम प्रतिनिधींशी संवाद साधला. त्यावेळी ते म्हणाले, खऱ्या अर्थाने बाळासाहेब ठाकरे, शिवसेना, आनंद दिघे आणि हिंदुत्वाचे विचार घेऊन आपली शिवसेना पुढे जात आहे. ते नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणूकीतील निकालावरुनही स्पष्ट झाले. शिवसेना आणि धनुष्यबाण यावर जनतेच्या न्यायालयाने शिक्कामोर्तब केले. त्यामुळेच प्रत्येक जिल्हा आणि तालुक्यातून लोक येत असल्याचा दावाही शिंदे यांनी यावेळी केला. तसेच केलेल्या विकास कामांमुळेच प्रत्येक जिल्ह्यातून आणि तालुक्यातून शिवसेना वाढीसाठी हे पदाधिकारी प्रयत्न करीत आहेत. निवडणूक आयोग आणि न्यायालय यांनाही दोष देणाऱ्या विरोधकांनाच कायमचे घरी बसविण्याचे काम जनतेने केल्याचेही ते म्हणाले. गेल्या अडीच वर्षात जी लोकहिताची कामे झाली त्याचीच लोकांनी नोंद घेतली.

त्यामुळेच प्रत्येक जिल्हा तालुक्यातून शिवसैनिक येत आहेत या सर्वांचे आपण मनापासून स्वागत करीत असल्याचेही ते म्हणाले. निवडणुकीपूर्वीच सांगितलं होते की, महायुतीचे २०० आमदार निवडून आणू. नाहीतर शेती करायला जाऊ. त्यानुसार आम्ही २०० हून अधिक उमदेवार निवडून आणले आहेत. आज ज्यांनी शिवसेनेत प्रवेश केला आहे. हे सर्वजण शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे विचार घेऊन पुढे जातील, असा विश्वास शिंदे यांनी व्यक्त केला.

## आनंददायी शिक्षण पद्धतीसाठी योगदान द्या - मंत्री दादाजी भुसे

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई,** दि. ०५: गुणवत्तापूर्ण आनंददायी शिक्षण पद्धतीत विद्यार्थी फक्त परीक्षांसाठी तयार न होता जीवनासाठी तयार होतात, आणि शिक्षण हा त्यांच्या आयुष्यातील आनंदाचा स्रोत बनतो. यामुळे शिक्षण क्षेत्रातील सर्वच घटकांनी आनंददायी शिक्षण पद्धतीच्या यशस्वीतेसाठी आपले योगदान दयावे, असे आवाहन शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी आज केले.

'गुणवत्तापूर्ण आनंददायी शिक्षण पद्धती' या विषयावर जयहिंद महाविद्यालय, मुंबई येथे आयोजित चर्चसत्रात मंत्री श्री. भुसे बोलत होते. यावेळी आमदार जयंत आजगावकर, प्रधान सचिव रणजितसिंह देओल, शालेय शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेचे संचालक राहुल रेखावार, प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी, माध्यमिक शिक्षण संचालक संपत सूर्यवंशी आणि राज्यातील प्राथमिक, माध्यमिक व शिक्षकेतर संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

मंत्री श्री. भुसे म्हणाले, शिक्षक अविरतपणे मुलांना चांगले शिक्षण देऊन त्यांच्या भविष्याला आकार देण्याचे काम करत असतो. गुणवत्तापूर्ण आनंददायी शिक्षण पद्धती राबवताना त्याचे घटक असणाऱ्या, ज्ञानदानाचे काम करणाऱ्या या घटकाच्या, त्यांच्या संघटनांच्या मागण्यांचा प्राधान्याने विचार केला जाईल. जे लहान-लहान प्रश्न आहेत ते त्वरित



> राज्याच्या शिक्षण विभागाचे आपण सर्वचजण एक घटक आहोत. आपण भावी पिढी घडविण्यासाठी जानदानाचे जे पवित्र काम करत आहात ते अतुलनीय व भाग्याचे आहे. गुणवत्तापूर्ण आनंददायी शिक्षण पद्धती हा आव्हानात्मक विषय असला तरी आपल्या सर्वांच्या सहकार्यातून तो यशस्वीपणे राबविला जाईल याची खात्री आहे. विद्यार्थ्यांसाठी असे वेगवेगळे उपक्रम राबवून शिक्षण विभागाचा एक रोडमॅप आपण ठरवू. येणाऱ्या काळात शैक्षणिक धोरण राबविताना सर्वांना सोबत घेऊन आपण काम करुया, असे आवाहन त्यांनी केले. शिक्षकांना त्यांचे मुख्य उद्दिष्ट यशस्वीरित्या पार पाडता यावे यासाठी त्यांना वेळ दिला जाईल. शिक्षण व शिक्षकासाठी जे-जे शक्य आहे ते केले जाईल
>
> **- दादा भुसे शिक्षण मंत्री**

सोडवले जातील. जे प्रश्न कायदे, नियम या संदर्भातील आहेत याबाबत सर्व संबंधितांची बैठक घेऊन त्यातूनही मार्ग काढला जाईल. शिक्षकांचे प्रश्न सोडविण्याबाबत शिक्षण विभागामार्फत नियमित आढावा, चर्चासत्रे आयोजित केली जातील. संघटनांनी आपल्या मागण्या लेखी स्वरूपात सादर कराव्यात.अशा सुचना त्यानी दिल्या. या चर्चासत्रात शाळांमध्ये भौतिक सुविधा, संगणक प्रणालीचा वापर वाढविणे, मुख्याध्यापकांच्या नियमित कार्यशाळा, वेतनेतर अनुदान वाढविणे, ॲकॅडमी शिक्षणावर शासनाचे नियंत्रण, जिल्हा परिषद शिक्षण विभाग पदोन्नती मध्ये शिक्षकांना संधी, राष्ट्रीय, राज्य, विभाग, जिल्हास्तरीय पुरस्कार प्राप्त शिक्षकांना वेतनवाढ, अशैक्षणिक कामापासून शिक्षकांची सुटका, जुनी पेन्शन योजना, प्रत्येक शाळेत कला व क्रीडा शिक्षक, सीबीएससी पॅटर्न लागू करणे, माध्यमिक शिक्षक संच मान्यता ऑनलाईन व्हावी, वेतन वेळेत व्हावे, अंशदायी अनुदान लवकर मिळावे अशा मागण्या विविध शिक्षक संघटनांच्या प्रतिनिधींनी मांडल्या.



## ज्येष्ठ नागरिकांची काळजी घेण्याची गरज -आशुतोष डुंबरे

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी** : ज्येष्ठ नागरिक हे समाजातील महत्त्वाचे घटक आहेत त्यांच्याही वेगवेगळया समस्या अडचणी आहेत, त्यांची काळजी घेणे आवश्यक आहे त्यामुळे पोलीस प्रशासनाच्यावतीने त्यांच्या समस्या व अडीअडचणी जाणून घेऊ आणि त्यांना पोलीस यंत्रणेचा माध्यमातून भक्कम आधार देण्याचे काम यापुढे पोलीस यंत्रणा यंत्रणा मार्फत करणार असुन तसे पोलिसांचे वतीने कार्य सुरू असल्याची माहिती पोलिस आयुक्त आशुतोष डुंबरे यांनी आयोजित कार्यक्रमात दिली.


जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई, संचलित
सौ.कमलताई किसन कथोरे कॉलेज, म्हसा मुंबई विद्यापीठाशी संलग्न
ADMISSION OPEN 2024-25
११ वी व १२ वी
ARTS, COMMERCE, SCIENCE
UNDER GRADUATE: B.A., B.Com., B.Sc. CHEMISTRY, B.Sc. MATHS, BAF, BMS
POST GRADUATE: M.Sc. CHEMISTRY, M.Com. ADVANCED ACCOUNTANCY, M.A. MARATHI, M.A. ECONOMICS, M.A. SOCIOLOGY, M.A. HISTORY
Look forward to a BRIGHTER FUTURE
7719814142
9130580111


## राज्यात सूक्ष्म सिंचन योजनेत निधीचा दुष्काळ?




दै.ठाणे जीवनदीप वार्ता

नाशिक - 'प्रति थेंब, अधिक पीक' सूक्ष्म सिंचन योजनेच्या लाभापासून राज्यातील पावणेदोन लाखहून अधिक शेतकऱ्यांना वंचित रहावे लागले आहे. केंद्र आणि राज्य सरकारकडे २०२३-२४ वर्षातील ७१६ कोटींचे अनुदान रखडल्याने ही स्थिती निर्माण झाल्याचे कृषी विभागाचे म्हणणे आहे. कृषी विभागाच्या एका बैठकीत ही आकडेवारी समजल्यानंतर कृषिमंत्री माणिक कोकाटे यांनी रखडलेल्या अनुदानाचा विषय केंद्रीय कृषिमंत्र्यांसमोर मांडण्याचे संकेत दिले होते. पाण्याच्या प्रत्येक थेंबाचा नियोजनपूर्वक वापर करून अधिकतम कृषी उत्पादन मिळवण्यासाठी केंद्र सरकार राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत सूक्ष्म सिंचन योजना राबवते. त्या अंतर्गत केंद्राकडून ६० टक्के तर, राज्य सरकारकडून ४० टक्के आर्थिक भार उचलला जातो. सूक्ष्म सिंचनाखालील क्षेत्र वाढविण्याचा योजनेचा मुख्य उद्देश आहे. राज्यातील ३४ जिल्ह्यांत मागेल त्याला ठिबक असा योजनेचा प्रचार झाला. त्यामुळे शेतकऱ्यांचा प्रतिसाद मिळाला. प्राप्त झालेले, निकषात बसणारे सर्व अर्जदार योजनेत समाविष्ट झाले.

या योजनेतून अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना ५५ टक्के तर, अन्य शेतकऱ्यांना ४५ टक्के अनुदान मिळते. केंद्राकडून राज्याला २०२३-२०२४ वर्षातील तिसऱ्या व चवथ्या हप्त्याची रक्कम मार्चपासून मिळालेली नाही. परिणामी, एक लाख ७७ हजार शेतकरी अनुदानाच्या प्रतिक्षेत आहेत. प्रलंबित असणारी ही रक्कम ७१६ कोटींच्या आसपास आहे. यामध्ये केंद्राकडे सुमारे ४२७ कोटी आणि उर्वरित राज्य सरकारचे असल्याचे कृषी विभागाकडून सांगण्यात आले. २०२३-२४ वर्षात नाशिक जिल्ह्यात २२६४ लाभार्थ्यांना २.११ कोटींचे अनुदान मिळाले. तर ६८९२ शेतकरी वंचित राहिले. त्यांच्यासाठी १८.३७ कोटींची आवश्यकता आहे. राज्यात ३४ जिल्ह्यांत कमी-अधिक प्रमाणात अशीच स्थिती आहे.

### अंमलबजावणीवर परिणाम

'प्रति थेंब अधिक पीक' योजनेच्या २०२३-२४ वर्षातील कोट्यवधींच्या प्रलंबित अनुदानामुळे या योजनेच्या अंमलबजावणीवर परिणाम झाल्याचे कृषी विभागाचे अधिकारी मान्य करतात. निधीअभावी आधीच पावणेदोन लाखहून अधिक शेतकऱ्यांचे अनुदान दिलेले नाही. अशा स्थितीत नव्या अर्जदारांना लाभ कसा देता येईल, असा त्यांचा प्रश्न आहे.

# पत्रकार दिन : 'दर्पण' वृत्तपत्राचे वैशिष्ट्य




मराठी वृत्तपत्राचे जनक आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांनी दर्पण हे मराठीतील सर्वात पहिले वृत्तपत्र आज म्हणजेच ६ जानेवारी रोजी सुरु केले. याच कारणामुळे आजचा दिवस संपूर्ण महाराष्ट्रात पत्रकार दिन म्हणून साजरा केला जातो. या दिवशी जांभेकर यांचे स्मरण करुन त्यांच्या कार्याचा आढावा घेतला जातो. बाळशास्त्री जांभेकर यांच्या जीवनाविषयी आपण थोडे जाणून घेऊया...ब्रिटिश सत्तेत असताना त्यांच्या विरोधात लिखाण करण्यास मनाई होती

बाळशास्त्री जांभेकर हे मुळात अतिशय कुशाग्र, उच्च गुणवत्ता असलेलं व्यक्तिमत्त्व होतं. ब्रिटिशांचे भारतात आगमन झाले होते. त्यानंतर २९ जानेवारी १७८० रोजी पश्चिम बंगालमध्ये 'बेंगॉल गॅझेट' नावाचे साप्ताहिक सुरु करण्यात आले. आपले विचार प्रभाविपणे मांडण्यासाठी वृत्तपत्र हे माध्यम अत्यंत प्रभावी आहे, याची जाणीव हळूहळू भारतीयांना होऊ सागली. त्यानंतर बेंगॉल गॅझेटच्या अर्ध्या दशकाने म्हणजेच ६ जानेवारी १८३२ रोजी बाळशास्त्री जांभेकर यांनी दर्पण या पहिल्या मराठी वृत्तपत्राची सुरुवात केली. जांभेकर यांना आपण दर्पणकार म्हणून ओळखतो. ब्रिटिश कालखंडात इंग्रजांच्या विरोधात लिखाण करण्यास मनाई होती. असा परिस्थितीतही जांभेकर यांनी दर्पणच्या संपादकपदाची धुरा समर्थपणे सांभाळली होती.

**दर्पणमध्ये नेमकं काय असायचं ?**

दर्पणचा पहिला अंक ६ जानेवारी १८३२ रोजी प्रकाशित झाला होता. त्यावेळी हा अंक मराठी तसेच इंग्रजी अशा दोन्ही भाषेत म्हणजेच जोडभाषेत प्रकाशित केला जायचा. एक इंग्रजी आणि एक मराठी असे दोन स्तंभ या वृत्तपत्रात असत. मराठी जनतेला देशात काय सुरु आहे हे समजावे म्हणून स्तंभ मराठीत लिहिला जायचा. तर वृत्तपत्रात काय लिहिले आहे हे ब्रिटिशांना समजावे म्हणून दुसरा स्तंभ इंग्रजीत लिहला जायचा. इंग्रजी सत्तेचे कायम लक्ष असूनही तब्बल साडे आठ वर्षे दर्पण हे वृत्तपत्र चालले. त्याचा शेवटचा अंक जुलै १८४० मध्ये प्रकाशित झाला.

**बाळशास्त्री जांभेकर बहुआयामी, बहुभाषिक आणि उत्तुंग व्यक्तिमत्त्व**

बाळशास्त्री जांभेकर यांनी महाराष्ट्राला पहिले वृत्तपत्र देऊन वैचारिक अभिसरणाची पेरणी केली. त्यांच्यानंतर वृत्तपत्र हे वैचारिक क्रांतीचे महत्त्वाचे साधन बनले. जांभेकर हे एक अतिशय हुशार आणि बहुआयामी व्यक्तिमत्व होते. त्यांना संस्कृत, मराठी, इंग्रजी आणि हिंदी या भाषा चांगल्या अवगत होत्या. शिवाय ग्रीक, लॅटिन, फ्रेंच, बंगाली आणि गुजराती या भाषांवरही त्यांचे प्रभुत्त्व होते. भूगोल, विज्ञान, गणित अशा विषयात ते पारंगत होते.रॉयल एशियाटिक सोसायटीच्या त्रैमासिकात शोधनिबंध प्रसिद्ध झालेले ते पहिले भारतीय आहेत. बाळशास्त्रींनी कुलाबा वेधशाळेचे संचालक म्हणूनही काम पाहिले. अशा या उत्तुंग व्यक्तिमत्त्वाल प्रणाम आणि सर्वांना पत्रकार दिनाच्या हार्दिक शुभेच्छा.

## आजचे राशीभविष्य

**मेष**
जोडीदाराकडून पूर्ण सहकार्य मिळेल. नातेसंबंध मजबूत होतील. आरोग्य बिघडण्याची शक्यता आहे. कुटुंबासोबत सहलीला जाऊ शकता.

**वृषभ**
मन प्रसन्न राहिल. एखाद्या व्यक्तीसोबतचा सौदा तोट्याचा ठरेल. विद्यार्थ्यांना वरिष्ठांकडून पूर्ण सहकार्य मिळेल. वरिष्ठांपासून सावध राहावे लागेल.

**मिथुन**
शत्रूंपासून सावध राहा. तुमची रखडलेली कामे पूर्ण होतील. तुम्हाला आळस सोडावा लागेल. कपाळावर चंदनाचा टिळा लावा. तुमच्या मनाला शांती मिळेल.

**कर्क**
इतरांना मदत कराल. जपून काम करा. घरी पाहुणे येण्याची शक्यता आहे. तुम्हाला काही पैसे खर्च करावे लागतील. घाईमुळे तुमचे काम बिघडू शकते.

**सिंह**
कुटुंबातील सदस्यांशी वाद झाला असेल तर तो मिटेल. नात्यात दरी निर्माण होऊ शकते. लग्नाचे प्रस्ताव येतील.कुटुंबातील सदस्य पार्टीचे आयोजन करतील.

**कन्या**
शत्रू तुमच्यासाठी समस्या निर्माण करतील. कामावर लक्ष केंद्रित करा. सावधगिरीन पुढे जा. वाहन जपून चालवा. समस्या उद्भवू शकतात.

**तूळ**
सावधगिरीन पुढे जा. वाहन जपून चालवा. समस्या उद्भवू शकतात. आज भाग्य ८९ टक्के तुमच्या बाजूने असेल. गणपतीला लाडू अर्पण करा.

**वृश्चिक**
मित्राच्या रुपात शत्रू तयार होतील. तुम्हाला सावध राहावे लागणार आहे. मेहनतीचे अनुकूल परिणाम मिळतील. तुम्ही आनंदी असाल.

**धनु**
पैशांची काही व्यवस्था करावी लागेल. व्यवसायात नवीन संधी मिळतील. पार्टनरशीपमध्ये व्यवसाय केल्यास चांगला नफा मिळेल.

**मकर**
दैनंदिन खर्च भागवण्यात यशस्वी व्हाल. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील. नोकरदार लोकांच्या कामात चिंता वाढू शकते. घाई करु नका.

**कुंभ**
आरोग्यापासून व्यवसायापर्यंत सर्व कामे काळजीपूर्वक करावे लागतील. आरोग्य बिघडू शकते. खाण्याच्या सवयींमध्ये निष्काळजी राहू नका.

**मीन**
नवीन काम सुरु केले असेल तर भावाचा सल्ला घ्या. व्यवसायात नफा मिळेल. तुमची सर्व कामे बुद्धीने कराल. इतरांचा सल्ला घेऊ नका.

## उर्जा मंत्रालयाचा
# 'साथी उपक्रम'काय आहे?

साथी योजना - वस्त्रोद्योग मंत्रालयाचा वीज मंत्रालयाशीनव्या पॉवरलूम उपकरणासाठी उपक्रम)

ईईएसएल विना अनामत खर्चाचे लघु व मध्यम युनिट्सना विजेवर चालणारे (पावरलूम) उपकरण उपलब्ध करणार आहे. केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्रालय आणि ऊर्जा मंत्रालयाने एक नवा उपक्रम 'साथी' (लघु उद्योगांच्या सहायतेसाठी वस्त्र उद्योग युनिट व पावरलूम्सचा विकास) साठी करार केला आहे. या योजनेच्या अंतर्गत, वीज मंत्रालयाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली सार्वजनिक क्षेत्रातील एक कंपनी एनर्जी एफिशिएंसी सर्विसेज लिमिटेड (ईईएसएस) विजेवर चालणारे हातमाग (पावरलूम), मोटर तसेच रेपियर किटची खरेदी करेल तसेच उद्योग धारकांना कोणताही अनामत रक्कम जमा करून न घेता लघु व मध्यम युनिट्सना उपलब्ध करून देईल.

साथी उपक्रमाची कार्यान्वयन प्रणाली केंद्र सरकारच्या 'साथी' उपक्रमाची कार्यवाही अखिल भारतीय स्तरावर ईईएसएल तसेच वस्त्रोद्योग आयुक्त कार्यालय द्वारे संयुक्त रुपाने केली जाते. या उपक्रमाची कार्यवाही सुरू करण्यासाठी इरोड, सूरत, महाराष्ट्रातील इचलकरंजी आदि प्रमुख हातमाग व पावरलूम वस्त्रोद्योग शहरात हातमाग प्रदर्शन आणि योजना तसेच कार्यशाळांचे आयोजन केले जाते.

साथी योजनेच्या अंतर्गत वीज व अन्य खर्चात होईल बचत -

या योजनेंतर्गत उपलब्ध होणाऱ्या उपकरणांचा वापर केल्याने वीज व अन्य खर्चामध्ये बचत होईल. तसेच ४ ते ५ वर्षाच्या मुदतीत पावरलूमधारक ईईएसएलला उपकरणांचा खर्च सुलभ हफ्त्यात परतफेड करेल. ईईएसएल ने या सामूहिक खरेदी, होलसेलमध्ये उपकरणांची खरेदी तसेच



आर्थिक मॉडलचा यशस्वी प्रयोग एलईडी बल्ब, स्मार्ट मीटर तसेच विजेवर चालणाऱ्या वाहनांसारख्या अनेक क्षेत्रांमध्ये केला आहे. हातमाग व पावरलूम धारकांना या उपकरणांच्या खरेदीसाठी सुरुवातीला कोणत्याही प्रकारचा खर्च करण्याची आवश्यकता नाही. ही उपकरणे विना खर्च वस्त्रोद्योग चालवणाऱ्या मालकांना दिली जातात. तसेच या उपकरणांची परतफेड करण्यासाठी कोणत्याही प्रकारचे अतिरिक्त मुल्य निर्धारित केले जाते किंवा रक्कमेवर अतिरिक्त व्याज आकारले जाते. कारण ईईएसएल च्या कर्जाची परतफेड वीज खर्चातील बचतीच्या माध्यमातून केली जाईल. उच्च क्षमतेच्या उपकरणांतून तसेच खर्चातील बचतीच्या परिणामातून कर्ज परतफेड केली जाईल. सामूहिक तसेच होलसेल मध्ये उपकरण खरेदी केल्याने भांडवल खर्चात घट होईल, त्याचा लाभ पावर लूम युनिट्सना सुपुर्द करण्यात येईल. यामध्ये परतफेडीची रक्कम व अवधीमध्ये कमी येईल.

**पावरलूम क्षेत्र देशातील अग्रणी -**

भारतात पावरलूम क्षेत्र मुख्य रूपाने एक असंगठित क्षेत्र आहे आणि त्यामध्ये सूक्ष्म व लघु युनिट्सची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. या हातमाग व पावरलुम उद्योगातून देशातील एकूण वस्त्र उत्पादनापैकी जवळपास ५७ टक्के उत्पादन केले जाते. देशात २४.८६ लाख पावरलूम युनिट्स आहेत. ज्या परंपरागत पद्धतीने वस्त्रनिर्मिती करतात. वस्त्रोद्योगाला विकसित करण्यासाठी व या क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञान पुरवण्याच्या उद्देश्याने भारत सरकार पावर टेक्स इंडियाच्या द्वारे परंपरागत पावरलूमचा विकास करत आहेत. ज्याच्या माध्यमातून साध्या व परंपरागत पावरलूमला प्रोसेस कंट्रोल उपकरणाने जोडले जातात. यामुळे उच्च उत्पादकता, उच्च गुणवत्ता तसेच ५० टक्के अधिक अतिरिक्त लाभ मिळतो. आतापर्यंत या योजनेच्या माध्यमातून १.७० लाख परंपरागत पावरलूम युनिट्सना आधुनिक बनवण्यात आले आहे. त्यामध्ये भारत सरकारने एकूण १८६ कोटींची सबसिडी दिली आहे.

एमएसएमई लोन साथी मोबाइल APP

MSME Loan योजनेबाबत कोणत्याही माहितीसाठी तसेच तक्रार दाखल करण्यासाठी सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगासाठी एक मोबाइल एप लॉंच करण्यात आला आहे. याच्या माध्यमातून सूक्ष्म लघु आणि मध्यम उद्योग संचालन संबंधित कोणताही माहिती, सूचना किंवा तक्रार केली जाऊ शकते. जसे टॅक्स संबंधी, कामगार, बँक संबंधी तसेच एखाद्या request साठी या मोबाइल एप्लिकेशनचा उपयोग केला जाऊ शकतो. Sathi App चे संपूर्ण नाव Sathi MSME samadhan platform आहे, जे गुगल प्ले स्टोअरवर उपलब्ध आहे.

MSME Sathi मोबाइल App download

ज्या अर्जदाराने या योजनेत अर्ज केला आहे, ते एमएसएमई साथी मोबाइल App डाउनलोड करून sathi App चा लाभ घेऊ शकतो.

यासाठी मोबाइलच्या गूगल प्ले स्टोअर वर जाऊन sathi MSME type करा. त्यानंतर त्यामुळे योग्य एप्लिकेशन निवडून ते डाऊनलोड करा.

App डाऊनलोड झाल्यानंतर install बटनावर क्लिक करून त्यात विचारलेली माहिती भरा. त्यानंतर तुम्ही MSME Sathi चा वापर करून अनेक माहिती मिळवू शकता.

## गीतासार



*भवान भीष्मश्च कर्णश्च कृपश्च समितिञ्जयः ।*
*अश्वत्थामा विकर्णश्च सौमदत्तिस्तथैव च ।१-८ ।*

अर्थ
**आपण-द्रोणाचार्य, पितामह भीष्म, कर्ण, युद्धात विजयी होणारे कृपाचार्य, अश्वत्थामा, विकर्ण तसेच सोमदत्ताचा मुलगा भूरिश्रवा. । १-८ ।**

*अन्ये च बहवः शूरा मदर्थे त्यक्तजीविताः ।*
*नानाशस्त्रप्रहरणाः सर्वे युद्धविशारदाः । १-९ ।*

अर्थ
**इतरही माझ्यासाठी जीवावर उदार झालेले पुष्कळ शूरवीर आहेत. ते सर्वजण निरनिराळ्या शस्त्रास्त्रांनी सुसज्ज असून युद्धात पारंगत आहेत. । १-९ ।**

*अपर्याप्तं तदस्माकं बलं भीष्माभिरक्षितम् ।*
*पर्याप्तं त्विदमेतेषां बलं भीमाभिरक्षितम्। १-१० ।*

अर्थ
**भीष्मपितामहांनी रक्षण केलेले आपले ते सैन्य सर्व दृष्टींनी अजिंक्य आहे; तर भीमाने रक्षण केलेले यांचे हे सैन्य जिंकायला सोपे आहे. । १-१० ।**

# जीवन कितीही सुंदर असलं




आजे सासूबाई आंघोळ उरकून, बाहेर तांदळाच्या ओल्या पिठाची रांगोळी काढत होत्या.

अनेक ठिपक्यांच्या रांगा आणि त्यांच्या सुरकुतलेल्या बोटां मधून भरभर पडणारी, न तुटणारी, ओल्या तांदूळ पिठाची ओळ.बघता बघता माझ्या डोळयां समोर अनेक पाकळयांचं सुन्दर कमळ तयार झालं, तेही ओळ कुठेही न तुटता.

थोड्या वेळाने बेल वाजली. मी दार उघडलं. रोजचा भाजीवाला आला होता. त्याने आपली टोपली खाली ठेवली तर त्याचा तोल थोडा सुटून, रांगोळीच्या एका पाकळीवर ती पाटी घासली. अजून तांदूळ पीठाच्या ओळी सुकल्या नव्हत्या, त्यामुळे ती पाकळी साहजिकच विस्कटली. आजीने इतका वेळ खपून काढलेली रांगोळी जेमतेम पंधरा मिनिटे सुद्धा टिकली नव्हती. मला खूप वाईट वाटलं.

मी त्या भाजीवाल्यावर ओरडणार, इतक्यात आजीच बाहेर आली, तिने भाजी घेतली, पैसे दिले आणि ती परत आत निघून गेली.

विस्कटलेल्या रांगोळी कडे तिने पाहिलं, पण काहीच प्रतिक्रिया दिली नाही. मी मात्र खूप वेळ हळहळत होते.

नंतर दुपारी जरा निवांत बसलो असता, मी आजींना विचारलं, इतकी खपून काढलेली सुरेख रांगोळी पंधरा मिनिटं सुद्धा टिकली नाही, तुम्हाला वाईट नाही वाटलं ?

त्या हसल्या, म्हणाल्या, रांगोळी काढीत होते तोवर ती माझी होती, ज्या क्षणी रांगोळी पूर्ण झाली, त्या क्षणी ती बघणाऱ्याची झाली.

रांगोळी काढताना ज्या आनंदाची अनुभूती मला झाली होती, त्याच आनंदाची अनुभूती तुला रांगोळी बघताना झाली ना ? मग झाला रांगोळीचा उद्देश सफल !

इतकी मन लावून काढलेली सुरेख रांगोळी पूर्ण झाली त्या क्षणी त्यांनी त्या रांगोळीतून स्वतःच्या भावना अलगद हलक्या हाताने आजींनी सोडवून घेतल्या होत्या.

कशातही अडकून राहू नये , सोडून द्यावे, संयमाने, आनंदाने, क्षमाशील व्रताने जीवन जगावे...

रांगोळीचा उद्देशच हा असतो. जीवन कितीही सुंदर असलं, तरी ते रांगोळी सारखंच अल्पजीवी आहे, हे स्वतःला दररोज बजावून सांगण्याचा रांगोळी हा एक सुंदर मार्ग.

**- सोशल मीडिया**

## आरोग्य टिप्स
# फक्त दोन अक्रोड खा निरोगी राहा



मेंदूसाठी फायदेशीर : अक्रोडमध्ये असलेले ओमेगा-३ फॅटी ॲसिड मेंदूच्या पेशी निरोगी ठेवण्यास मदत करतात. हे स्मरणशक्ती, एकाग्रता आणि शिकण्याची क्षमता वाढवते.

**हृदयाच्या आरोग्यासाठी चांगलेः** अक्रोडमध्ये असलेले मोनोअन सॅच्युरेटेड फॅटी ॲसिड्स खराब कोलेस्ट्रॉल कमी करण्यास आणि चांगले कोलेस्ट्रॉल वाढविण्यास मदत करतात. त्यामुळे हृदयविकाराचा धोका कमी होतो.हाडे मजबूत करतेः अक्रोडमध्ये कॅल्शियम आणि मॅग्नेशियम असते जे हाडे मजबूत करण्यास मदत करते.

त्वचेसाठी चांगलेः अक्रोडमध्ये व्हिटॅमिन ई असते जे त्वचा निरोगी ठेवण्यास मदत करते.

# राष्ट्रीय पुरस्कार विजेत्या ज्येष्ठ अभिनेत्रीचे निधन



## वयाच्या ६०व्या वर्षी घेतला अखेरचा श्वास

बांगलादेशमधील लोकप्रिय आणि राष्ट्रीय पुरस्कारावर नाव कोरलेल्या अभिनेत्री अंजना रहमान यांचे निधन निधन झाले,त्यांच्या अचानक जाण्याने मनोरंजन विश्वातून शोक व्यक्त केला जातो आहे. शनिवारी पहाटे १ वाजून १० मिनिटांनी वयाच्या ६० व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या निधनाच्या वृत्ताने सिनेजगताला मोठा धक्का बसला असून मित्र परिवार, कुटुंबीय आणि जवळच्या व्यक्तींकडून दुःख व्यक्त केले जाते आहे. अंजना यांनी त्यांच्या कारकिर्दीत जवळपास ३०० चित्रपटात काम केले होते. 'परिणीता' या सिनेमासाठी त्यांना राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात आलेला.

मीडिया रिपोर्ट्सनुसार अभिनेत्रीवर बांगला देशातील ढाका याठिकाणी असणाऱ्या बंगाबंधू शेख मुजीब मेडिकल युनिव्हर्सिटी (बीएसएमएमयू) हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू होते. त्या गेल्या तीन आठवड्यांपासून आजारी होत्या.बांगलादेश फिल्म आर्टिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष मीशा सावदागोर यांनी अंजना यांच्या निधनाच्या वृत्ताची पुष्टी केली. त्यांच्या सन्मानार्थ शनिवारी दुपारी एफडीसी येथे अंजना यांचा नमाज-ए-जनाजा होणार असल्याचे त्यांनी सांगितले. सोशल मीडियावरही अंजना यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी फिल्म इंडस्ट्रीतील मंडळींनी पोस्ट शेअर केल्या आहेत.

विविध मीडिया रिपोर्टमध्ये असे समोर आले आहे की, त्यांना सौम्य ताप आला होता आणि त्यानंतर त्यांची तब्येत ढासळू लागली. कालांतराने त्यांची प्रकृती इतकी बिघडली की औषधोपचारही काम करत नव्हते. त्यानंतर अभिनेत्रीला रक्त संक्रमण झाल्याचे निदान झाले. अंजना यांना एका खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आणि त्याठिकाणी त्यांनी अनेक दिवस सीसीयूमध्ये आयुष्याशी झुंज दिली. दुर्दैवाने, त्यांच्या प्रकृतीत अपेक्षेइतकी सुधारणा झाली नाही. त्यामुळे बुधवारी त्यांना बीएसएमएमयू रुग्णालयात हलवण्यात आले होते. याठिकाणी त्यांच्या तब्येतील सुधारणा होईल, अशी सर्वांना आशा होती. तसे घडले नाही आणि त्यांची प्रकृती आणखी खालावली. त्याच रात्री त्यांना लाईफ सपोर्टवर ठेवण्यात आले होते, मात्र मृत्यूशी सुरू असणारी ही झुंज अंजना जिंकू शकल्या नाहीत आणि शनिवारी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या पश्चात दोन मुली आणि एक मुलगा असा परिवार आहे.

# वयानुसार दररोज किती मिनिटे चालावे?



चालणे आरोग्यासाठी चांगले मानले जाते, आरोग्य तज्ञांच्या मते, दररोज चालणे अनेक आजारांना आपल्यापासून दूर ठेवते.चालणे हा सर्वोत्तम व्यायाम मानला जातो. हा एक व्यायाम आहे जो कोणत्याही वयोगटातील लोक करू शकतात.चालण्याने लठ्ठपणा तर कमी होतोच शिवाय अनेक आजार बरे होतात. डॉक्टरांच्या म्हणण्यानुसार, प्रत्येक व्यक्तीला दररोज १० हजार पावले चालण्याचा सल्ला दिला जातो, यासाठी तुम्हाला दररोज किमान १ तास चालणे आवश्यक आहे. तथापि, वयानुसार चालण्याचे प्रमाण कमी किंवा जास्त असू शकते. तुमच्या वयानुसार तुम्ही रोज किती वेळ चालले पाहिजे ते जाणून घ्या, जेणेकरून तुम्ही आजारांचा धोका दीर्घकाळ दूर ठेवू शकाल आणि तंदुरुस्त राहू शकाल.

१८ ते ३० वयोगटातील लोकांनी दररोज ३० ते ६० मिनिटे चालावे.

३१ ते ५० वयोगटातील लोकांनी दररोज ३० ते ४५ मिनिटे चालावे.

५१ ते ६५ वयोगटातील व्यक्तींनी दररोज ३० ते ४० मिनिटे चालावे.

६६ ते ७५ वयोगटातील लोकांनी दररोज २० ते ३० मिनिटे चालावे.

७५ वर्षांवरील व्यक्तींनी दररोज १५ ते २० मिनिटे चालावे.

४० वर्षांच्या आसपासच्या लोकांनी दररोज सुमारे ११,००० पावले उचलली पाहिजेत.

५० वर्षे वयोगटातील लोकांनी दररोज १०,००० पावले चालणे आवश्यक आहे.

६० वर्षांवरील लोकांनी दररोज ८,००० पावले चालणे आवश्यक आहे.

**चालण्याचे अनेक फायदे आहेतः**

यामुळे स्नायू आणि हाडे मजबूत होतात.

चालण्याने हृदयविकार, पक्षाघात, उच्च रक्तदाब यांसारख्या आजारांचा धोका कमी होतो.

चालण्याने कॅलरीज बर्न होतात आणि वजन कमी होते.

चालण्याने हाडे मजबूत होतात आणि ऑस्टिओपोरोसिसचा धोका कमी होतो.

चालणे रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करते आणि रोगांशी लढण्यास मदत करते.

चालणे तणाव आणि चिंता कमी करते आणि मूड सुधारते.

चालणे झोपेची गुणवत्ता सुधारते.

चालणे हा सांध्यांसाठी एक सोपा व्यायाम आहे आणि सांध्यांचे आरोग्य आणि लवचिकता सुधारते.

चालणे ही एक शारीरिक क्रिया आहे जी काही अधिक जोमदार शारीरिक हालचालींशी संबंधित जोखमींशी संबंधित नाही.

चालणे कोणत्याही वयात करता येते.

अस्वीकारणः ही माहिती सामान्य समजुतीवर आधारित असून केवळ माहितीसाठी दिली जात आहे. वेबदुनिया याला दुजोरा देत नाही. कोणतेही उपाय अमलात आणण्यापूर्वी तज्ञांचा सल्ला घ्यावा.

# उरणच्या हवेचा गुणवत्ता निर्देशांक वर्षभर १५० पार

## उरणकरांना मुखपट्टी वापरण्याचा सल्ला



दै.ठाणे जीवनदीप वार्ता
□ प्रतिनिधी

उरण : देशातील सर्वात प्रदूषित परिसर म्हणून उरणची नोंद झाली असतांना गेल्या सरत्या वर्षात उरणमध्ये सरासरी हवेचा गुणवत्ता निर्देशांक १५० ते २०० च्या पातळीवर राहिला आहे. ही मात्रा मानवी शरीरासाठी घातक म्हणून गणली जाते. या हानिकारक दूषित हवेमुळे वर्षभर उरणकरांचा श्वास कोंडला आहे. या स्थितीवर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने उपाययोजना करण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे.

सध्या मुंबई आणि नवी मुंबई या शहरातील वाढत्या प्रदूषणाची दखल येथील स्थानिक प्रशासनाने घेत त्यासाठी च्या उपाययोजना सुरू केल्या आहेत. मात्र दुसरीकडे या दोन प्रमुख शहराचे उपनगर असलेल्या उरण आणि परिसरात दिवसेंदिवस हवेची गुणवत्ता खालावू लागली आहे. येथील वाढत्या प्रदूषणावर उपाययोजना करण्याच्या सूचना संबंधित आस्थापनाना देण्यात आल्या असल्याचा दावा महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने केला आहे. असे असले तरी वर्षभर सातत्याने येथील हवेतील धुळीकणात वाढ होऊ लागली आहे. हवेचा वाढता गुणवत्ता निर्देशांक सामान्य पातळीवर आणण्यासाठी उपाययोजना करण्याची मागणी गेल्या वर्षी उरण पनवेल राष्ट्रीय महामार्ग आंदोलन करीत उरण सामाजिक संस्थेने केले होते. त्यावेळी काही प्रमाणात तात्पुरती नियोजन झाले होते. मात्र त्यानंतर पुन्हा परिस्थिती जैसे थे आहे. उरण परिसरातील हवेची गुणवत्ता मोजण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण मंडळाने दोन ठिकाणी नोंदणी केली जात असल्याचा ही दावा केला आहे. तसेच येथील धूलिकणात वाढ झाली आहे. मात्र ही हवा घातक नसल्याचे त्यांचे म्हणणे आहे. तर मानवी शरीरासाठी चांगल्या हवेचा

**गेल्या वर्षी उरण पनवेल राष्ट्रीय महामार्ग आंदोलन करीत उरण सामाजिक संस्थेने केले होते. त्यावेळी काही प्रमाणात तात्पुरती नियोजन झाले होते. मात्र त्यानंतर पुन्हा परिस्थिती जैसे थे आहे. उरण परिसरातील हवेची गुणवत्ता मोजण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण मंडळाने दोन ठिकाणी नोंदणी केली जात असल्याचा ही दावा केला आहे. तसेच येथील धूलिकणात वाढ झाली आहे. मात्र ही हवा घातक नसल्याचे त्यांचे म्हणणे आहे.**

गुणवत्ता निर्देशांक नियमावली नुसार निर्देशांक मात्रा ही ० ते ५० किंवा १०० पर्यंत चांगली मानली जाते. परंतु १०१ ते १५० पर्यंतचा निर्देशांक ही पातळी निरोगी व्यक्तीला ही हानिकारक मानली जात आहे. तर त्यापुढील नोंद ही अति घातक पातळीवर मानली जाते. उरणची हवेची गुणवत्ता ही अनेकदा ३०० पार ही पोहचली आहे. त्यामुळे उरण मधील नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

थंडीतील धुके की धुरके सध्या उरणमध्ये दिवसभर ढगाळ आणि धुक्याचे वातावरण पसरले असते. वातावरणातील दिवसभराच्या धुक्यामुळे वातावरणात धुके की धुरके याचा अंदाज येत नाही. धुरक्यात नायट्रोजन ऑक्साईड, सल्फर डायॉक्साईड, कार्बन डायॉक्साईड या घातक वायूंचे प्रमाण अधिकचे असल्याने मानवी शरीरावर याचे परिणाम होण्याची शक्यता वाढत आहे. वाढत्या हवा प्रदूषणा पासून बचाव करण्यासाठी नागरिकांनी मुखपट्टीचा वापर करण्याची सूचना दिली जात आहे.

# वसई विरार पालिका परिवहन सेवेच्या भंगार बसला आग

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

वसई : नालासोपारा पूर्वेच्या भागात पालिकेच्या परिवहन सेवेच्या भंगार बसला भीषण आग लागल्याची घटना घडली आहे. रविवारी रात्री आठच्या सुमारास ही घटना घडली. या आगीवर अग्निशमन दलाने नियंत्रण मिळवून आग आटोक्यात आणली. महिनाभरात या भंगार बसला आग लागण्याची ही तिसरी घटना आहे.

नालासोपारा पूर्वेकडील सनशाइन येथे महापालिकेने भंगार झालेल्या परिवहन सेवेच्या बसेस ठेवण्यात आल्या आहेत. या भंगार बस कडे दुर्लक्ष झाले असल्याने या ठिकाणी गर्दुल्ले यांचा वावर अधिकच वाढला आहे. त्यामुळे सातत्याने या भागात बस ला आग लागण्याचे प्रकार समोर येत आहेत.

रविवारी आठच्या सुमारास अचानकपणे या बसला आग लागल्याने खळबळ उडाली होती. या घटनेची माहिती नागरिकांनी तात्काळ महापालिकेच्या अग्निशमन दलाला दिली. माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी पोहचून आगीवर नियंत्रण मिळवण्याचे काम सुरू केले. अवघ्या अर्ध्या तासांतच जवानांनी आगीवर नियंत्रण मिळविले. सुदैवाने या आगीत कोणतीच जीवितहानी झाली नसून यात भंगार बस यात जळून खाक झाली.

याआधी बसला दोन वेळा आग लागली होती. त्यानंतर पालिकेने याबसेस त्याच जागेत दुसऱ्या ठिकाणी हलविण्यात आल्या. मात्र तरीही आग लागण्याचे प्रकार थांबत नसल्याने नागरिकांनी चिंता व्यक्त केली आहे. या बसेसकडे लक्ष दिले जात नसल्याने या ठिकाणी गर्दुल्ले ही धूम्रपान करण्यासाठी जात असतात त्यामुळे असा प्रकार घडला असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

# नवी मुंबईत २६६ तळीरामांवर कारवाई

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

नवी मुंबई : नववर्षाच्या पूर्वसंध्येला २६६ मद्यपी वाहन चालकांवर तर वाहतूक नियमभंग करणाऱ्या २ हजार ३५७ वाहन चालकांवर कारवाई करण्यात आली आहे. ही कारवाई ३१ डिसेंबर २०२४ ते १ जानेवारी २०२५ सकाळी ६ पर्यंत लावण्यात आलेल्या बंदोबस्ता दरम्यान करण्यात आली आहे.

२०२५ सालाचे स्वागत करण्यासाठी नवी मुंबईत सर्वत्र उत्साह दिसून येत होता. कुठलाही अनुचित प्रकार घडू नये म्हणून पोलीस विभागही सज्ज झाले होते. यात अतिउत्साहाच्या भरात मद्य प्राशन करून गाडी चालवणाऱ्यांवर वाहतूक पोलिसांची विशेष नजर होती. मद्य प्राशन करून गाडी चालवत असताना अपघाताची शक्यता जास्त असल्याने शहरातून जाणारे महामार्ग, शहरांतर्गत प्रमुख चौक, तसेच उरण पनवेल येथील शेतघराकडे जाणाऱ्या मार्गावर विशेष बंदोबस्त लावण्यात आला होता. जागोजागी संशयित वाहन चालकांची मद्यचाचणी घेतली जात होती. यात मद्य प्राशन करून वाहन चालवणारे २६६ वाहन चालक आढळून आले. त्यांच्या विरोधात तात्काळ कारवाई करण्यात आली. यात सर्वाधिक मद्यपी वाहन चालक तुर्भे भागात आढळून आले तर सर्वात कमी मद्यपी गव्हाण फाटा येथे आढळून आले.

**गेल्या वर्षीच्या तुलनेत मद्यपी वाहन चालकात थोडी वाढ झाली आहे. मात्र कुठेही अनुचित प्रकार अपघात घडला नाही. अशी कारवाई ३१ डिसेंबर रात्री अधिक होत असली तरी अन्य दिवशीही त्यात सातत्य ठेवण्यात येणार आहे. – तिरुपती काकडे (पोलीस उपायुक्त वाहतूक शाखा)**

# अखेर वर्क ऑर्डर निघाली

## फांगुणगव्हाण मोरोशी साकव मार्गी लागणार

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
कल्याण □ प्रतिनिधी

कल्याण : मुरबाड तालुक्यातील शेवटची ग्रामपंचायत असलेली फांगुणगव्हाण ते मोरोशी दरम्याच्या साकावची अखेरीस वर्क ऑर्डर निघाली असून लवकरच काम सुरू होईल अशी माहिती मिळत आहे, पत्रकार संजय कांबळे यांनी याबाबत केलेला पाठपुरावा, ठेवलेले सातत्य यामुळे त्यांच्या सकारात्मक पत्रकारीतेला यश मिळाले असून फांगुणगव्हाण ग्रामपंचायतीचे सरपंच, उपसरपंच, सदस्य हे त्यांचे आभार मानून यथोचित सन्मान करणार आहेत.

नैसर्गिक सौदर्याने नटलेल्या माळशेज घाटातील शेवटची ग्रामपंचायत म्हणून फांगुणगव्हाण ओळखली जाते.आपरंतु अद्यापही मुरबाड तालुक्यातील आदिवासींना,रस्ते, आरोग्य, पाणी,दिवाबत्ती यासारख्या मुलभूत सोईसुविधा मिळवण्यासाठी सरकारी कार्यालयाचे उंबरे झिजवावे लागतात,

फांगुणगव्हाण या १००टक्के आदिवासी ग्रामपंचायत हद्दीतील लोकांना,शाळकरी मुला मुलींना मोरोशी येथे जाण्यायेण्यासाठी रस्ता नाही, आहे तो खूपच लांब व त्रासदायक आहे, त्यामुळे हे लोक या गावादरम्यान असलेल्या माशांचाओहळ/नाला यातून जीव धोक्यात घालून जावे लागते, काही वर्षांपूर्वी या नाल्यातून एक मुलगा वाहून गेला होता, त्यामुळे या नाल्यावर साकाव/पुल व्हावा म्हणून यांनी शासन दरबारी अर्ज, विनत्या, तक्रारी, करून थकले, शेवटी या सर्वांनी एकत्र हा विषय पत्रकार संजय कांबळे यांना सांगितला, त्यांनी याचा पाठपुरावा करून विविध दैनिक वृत्तपत्रे व एस न्यूज


GOVERNMENT OF MAHARASHTRA
OFFICE OF THE EXECUTIVE ENGINEER
WORK ORDER

महाराष्ट्र मधून बातमी प्रसिद्ध केल्या, ठाणे जिल्हा परिषदेचे सीईओ, रोहन घुगे, बांधकाम विभागाचे एस आर चव्हाण, तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग , जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी विशेष बाब म्हणून या साकावसाठी तब्बल ५१लक्ष रुपये मंजूर केले, परंतु त्याची वर्क ऑर्डर निघत नव्हती, यावर पुन्हा बातम्या प्रसिद्ध करताच अखेरीस ३०डिसेंबर२०२४रोजी या कामाची वर्क ऑर्डर निघाली असून लवकरच प्रत्यक्षात कामाला सुरुवात होईल असे सांगितले जाते.

त्यामुळे गेल्या कित्येक वर्षांपासून रस्त्याविना सुरु असलेला आमचा वनवास आता संपेल असा विश्वास सुदाम भला , भगवान भला, किरण कारभाळ, भाऊ वाख, मा उपसरपंच रविंद्र भला, नानू मेंगाळ,सदस्यां मनिषा कारभळ, राजु भला आदी ग्रामस्थांनी व्यक्त केला.

तर या साकाव चा सतत पाठपुरावा, कल्याण चे पत्रकार संजय कांबळे यांनी केला, शिवाय, सकारात्मक बातम्या प्रसिद्ध केल्या त्यामुळे त्यांचा यथोचित सन्मान करण्यात येणार असल्याचे या ग्रामस्थांनी सांगितलं.



# वलसाड पॅसेंजरच्या आजपासून रचनेत बदल

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

पालघर : वलसाड फास्ट पॅसेंजर या गाडीच्या डबल डेकर च्या आयुर्मान संपुष्टात येत असल्याने तसेच या पद्धतीचे डबल डेकर डबे उपलब्ध नसल्याने या गाडीला ५ जानेवारी २०२५ पासून इतर एक्सप्रेस, शटल व पॅसेंजर गाडी प्रमाणे डबे जोडण्या चा प्रस्ताव पश्चिम रेल्वेने अंतिम केला आहे. या प्रस्तावात वलसाड, सुरत, बडोदा दरम्यान धावणाऱ्या एक्सप्रेस व पॅसेंजर गाड्याचे आयसीएफ कंपनी ने उत्पादित रेक आलटून पालटून साखळी पद्धतीने वापरण्याचे योजिले असून काही पॅसेंजर गाड्यांचे गंतव्यस्थान व थांबे बदलण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहेत.

सध्या ११ डबल डेकर डबे असणाऱ्या वलसाड फास्ट पॅसेंजर ला एकूण १८ डबे असून नव्याने प्रस्तावित करण्यात आलेला रचनेत ही गाडी २२ डब्यांची करून त्यामध्ये १५ सिंगल डेकर डबे, तीन वाईस फर्स्ट क्लास व प्रत्येकी दोन मालवाहू डबे बसविण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे. हा बदल ५ जानेवारी पासून करण्याची प्रस्तावित असून या संदर्भातील अधिसूचना प्रसारित झाली आहे. वलसाड फास्ट पॅसेंजर च्या डब्यांच्या रचनेत बदल करताना या गाडीचा रेक चा वापर वापी पॅसेंजर, वलसाड मुंबई फास्ट पॅसेंजर, वलसाड भरूच एक्सप्रेस, बलसाड विरार एक्सप्रेस, विरार सुरत शटल, सुरत विरार शटल व विरार वलसाड शटल या गाड्यांसाठी आलटून पालटून करण्याचा विचाराधीन आहे. यामुळे या सर्व गाड्यांचे डब्यांचे रचना व त्यांची संरेखन एकाच पद्धतीची ठेवण्याची पश्चिम रेल्वे प्रयनशील आहे.

या सुधारित रचनेमुळे ५९०२४ वलसाड मुंबई सेंट्रल फास्ट पॅसेंजर, ५९०२३ मुंबई सेंट्रल बलसाड फास्ट पॅसेंजर गाडी ची एक फेरी मुंबई सेंट्रल ते वापी (५९०४५) व वापी ते मुंबई सेंट्रल (५९०४६) अशी वाढविण्यात आली आहे. याच गाडीचा रेक वलसाड बडोदा एक्सपरीस (५९०४९), बडोदा बलसाड एक्सप्रेस (५९०५०), वलसाड विरार शटल (५९०४०), विरार सुरत शटल (०९००१), सुरत विरार शटल (०९००२) व विरार वलसाड शटल (५९१०३९) या गाड्यांच्या करिता वापण्यात येणार आहे. वलसाड फास्ट पॅसेंजर, वलसाड बरोदा पॅसेंजर तसेच विरार सुरत शटल या गाड्यांच्या दोन्ही दिशेच्या प्रवासाच्या वेळेमध्ये व थांबांमध्ये कोणत्याही प्रकारचा बदल झालेला नाही.

# अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर भीषण अपघात - दोघांचा मृत्यू, दोन गंभीर

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

डहाणू : मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर धानीवरी गावच्या हद्दीत आज दुपारी (५ जानेवार) दुपारी झालेल्या प्रवासी वाहनाच्या भीषण अपघात झाला असून यामध्ये दोन ज्येष्ठ नागरिकांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. उद्योगपती सायरस मिस्त्री यांच्या अपघाती निधनाप्रमाणेच वाहनाच्या मागच्या आसनावर बसणाऱ्या या प्रवाशांनी सीट बेल्ट घातला नसल्याने त्यांचा मृत्यू झाल्याचे दिसून आले आहे.

डहाणू तालुक्यातून कडून गुजरात कडे दुपारी एक वाजल्याच्या सुमारास निघालेल्या वाहनावरील चालकाचे नियंत्रण सुटल्यामुळे वाहन रस्त्याच्या खाली उतरून कडेला असलेल्या खड्ड्यात कोसळले. वाहनाचा वेग जास्त असल्यामुळे वाहन खड्ड्यात पडल्यानंतर २ ते ३ वेळा उलटून ५० मिटर लांब फेकले गेले आहे.

अपघाता दरम्यान वाहनाच्या पुढच्या बाजूला बसलेल्या पती-पत्नीने सीट बेल्ट लावल्याने ते जखमी झाले असून वाहनाच्या मागच्या आसनावर बसलेले व्याही (पती व पत्नी यांचे वडील) रमलाबेन आरीवाला आणि अमृतलाल घिवाला या दोन ज्येष्ठ नागरिकांचा जागीच मृत्यू झाला. या अपघातात चालक व त्याची पत्नी गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर कासा उपजिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. सायरस मिस्त्री यांच्याप्रमाणेच दोघांचे अपघाती निधन ४ सप्टेंबर २०२२ रोजी एका आलिशान गाडीमधून गुजरात येथून मुंबईकडे परतताना सायरस मिस्त्री यांच्या वाहना ने चारोटी जवळील सूर्या नदीच्या पुलाच्या कठड्याला जोरदार धडक दिली होती. या अपघात समयी गाडीमध्ये मागच्या आसनावर बसलेल्या सायरस मिस्त्री व जहांगीर पांडोल हे अपघाता दरम्यान आपटले गेल्याने त्यांच्या जागीच मृत्यू झाला होता.



# पोई आदिवासी पाड्यात मोफत आरोग्य शिबीर

कल्याण : युवा संस्कार संस्था गेली १४ वर्षांपासून ठाणे जिल्ह्यातील कल्याण, मुरबाड व शहापूर तालुक्यातील ग्रामीण भागातील गोरगरीब लोकांसाठी शिक्षण आरोग्य व रोजगार ह्या विषयावर काम करत आहे आदिवासी पाड्यात मोफत अभ्यास वर्ग चालवत असताना मुलांमध्ये व पालकांमध्ये नेहमीच अनेक आरोग्य विषयावर समस्या येत असतात म्हणून आदिवासी पाड्यात नेहमीच आरोग्य शिबीर आयोजित करत असतात. आजच्या आरोग्य शिबीर ५५ लोकांनी फायदा घेतला हा शिबीर यशस्वी करण्यासाठी युवा संस्कार संस्था अध्यक्ष सोमनाथ राऊत, डॉ.वर्षा राठोड, हेमा बच्छाव, मिलिंद बच्छाव, घोडवींदे सर, दिलीप बुटेरे व ग्रामस्थ मंडळ पोई आदि मान्यवर उपस्थित होते

# ठाणे जिल्हा उद्योग केंद्राच्या वतीने महाराष्ट्र निर्यात संमेलनाचे आयोजन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे,दि.०५ : ठाणे जिल्हा उद्योग केंद्र यांच्यामार्फत दि.७ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ९ वाजता नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, ठाणे येथे महाराष्ट्र निर्यात संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. ठाणे जिल्ह्यातील लघु व मध्यम उद्योग यांना निर्यात संबंधित योजना व उपक्रमांबद्दल माहिती देणे तसेच निर्यात तज्ज्ञांच्या मदतीने त्यांना मार्गदर्शन व सहकार्य प्रदान करणे, हे या संमेलनाचे मुख्य उद्दिष्ट आहे. हे संमेलन जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडणार असून विकास आयुक्त (उद्योग) आणि महाराष्ट्र उद्योग, व्यापार आणि गुंतवणूक सुविधा सेलचे अध्यक्ष, राज्याचे निर्यात आयुक्त दीपेंद्र सिंह कुशवाह उपस्थितांना मागदर्शन करणार आहेत. तरी उद्योग क्षेत्रातील इच्छुकांनी या संमेलनास मोठया संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहनहे या संमेलनाचे मुख्य उद्दिष्ट आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली पार पडणार असून उद्योग सहसंचालक श्रीमती विजू शिरसाठ आणि जिल्हा उद्योग केंद्राच्या महाव्यवस्थापक सोनाली देवरे यांनी केले

# बंदी असूनही बाजारात 'चिनी लसूण'?



**२०१४ मध्ये भारत सरकारने चिनी लसणावर बंदी घातली होती. लसणाच्या गगनाला भिडलेल्या किमतीमुळे व्यापाऱ्यांनी चिनी लसूण नेपाळमार्गे बिहारला आयात करून बाजारात पुरवठा करण्यास सुरुवात केली. या हंगामात लसणाची मागणी आणखी वाढते. याशिवाय अनेक खाद्यपदार्थ आहेत ज्यामध्ये लसूण वापरला जातो. चायनीज असो वा भारतीय पदार्थ, प्रत्येक गोष्टीत लसणाचा वापर केला जातो**

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
□ प्रतिनिधी

**सध्या बाजारात लसणाच्या किमती झपाट्याने वाढत आहेत, त्यामुळे बिहारच्या बाजारपेठेत चायनीज लसूण मोठ्या प्रमाणात विकला जात आहे. सरकारने फार पूर्वीपासून भारतीय बाजारपेठेत याला बंदी घातली असली, तरी नफा कमावण्यासाठी व्यापारी ते नेपाळमार्गे बिहारमध्ये आणून बाजारात पुरवठा करत आहेत. पूर्णिया पोलिसांनी एका व्यावसायिकाकडून सुमारे १ कोटी रुपयांचा चायनीज लसूण जप्त केल्यावर ही बाब चर्चेत आली. या लसणामुळे आतड्यांमध्ये जळजळ आणि कर्करोगासारखे आजार होऊ शकतात.**

चिनी लसूण भारतीय लसणापेक्षा आकाराने मोठा आणि दिसायला उजळ असतो. त्याच्या कळ्याही मोठ्या आणि जाड असतात. चिनी लसणाची सर्वात मोठी ओळख म्हणजे त्याचा रंग आणि मोठा आकार. याचा रंग थोडा गुलाबी असतो. या लसणाच्या तळाशी मुळे नसतात तर देशी लसणाच्या तळाशी मुळे असतात.

### चिनी लसणावर भारतात बंदी का?

२०१४ मध्ये भारत सरकारने चिनी लसणावर बंदी घातली होती. एका वृत्तसंस्थेने घेतलेल्या मुलाखतीनुसार हृदयरोगतज्ज्ञ डॉ.अभिषेक कुमार सांगतात की, चायनीज लसणात जास्त प्रमाणात रासायनिक कीटकनाशकांचा वापर केला जातो. जगात सर्वाधिक लसणाचे उत्पादन चीनमध्ये होते. कीटकनाशकांमध्ये क्लोरीनसारखे रसायन वापरले जाते, जे शरीरासाठी अत्यंत धोकादायक आहे. इतकेच नाही तर क्लोरीनसोबत मिथाइल ब्रोमाइड नावाचे बुरशीविरोधी रसायनही वापरले जाते. याच्या वापरामुळे कॅन्सरसह अनेक गंभीर आजार होत असल्याचे अनेक तपासणीत समोर आले आहे.

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री. रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले. (या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८/९१५८०७८६०१ E Mail – jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024 (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी

दैनिक ठाणे
# जीवनदीप वार्ता
ठाणे ■सोमवार
०६ जानेवारी २०२५
jeevandeepvartanews2020@gmail.com

## उरण येथील लोकांकिकां नाट्योत्सवाला प्रेक्षकांची दाद

दै.ठाणे जीवनदीप वार्ता ☐ उरण प्रतिनिधी

**मुंबई :** उत्कंठावर्धक कथानक, लक्षवेधी तांत्रिक बाजू आणि प्रयोगशील सादरीकरणाला प्रेक्षकांनी टाळयांच्या कडकडाटात दिलेली साथ, अशा उत्साहवर्धक वातावरणात उरण येथील जेएनपीए टाऊनशिपच्या बहुद्देशीय सभागृहात सर्वोत्कृष्ट 'लोकसत्ता लोकांकिकां'चा 'नाट्योत्सव' प्रेक्षकांनी शनिवारी अनुभवला. यावेळी युवा रंगकर्मींच्या रंगमंचीय अविष्काराला दाद देण्यासाठी आणि प्रेक्षकांचा उत्साह द्विगुणित करण्यासाठी सुप्रसिद्ध अभिनेते सुबोध भावे यांनी हजेरी लावली होती. राज्यातील युवा रंगकर्मींच्या कल्पनाशक्तीला चालना देणाऱ्या आणि त्यांच्यातील कलात्मकतेला प्रोत्साहन देणाऱ्या 'लोकसत्ता लोकांकिका' या राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन मराठी एकांकिका स्पर्धेचे व्यासपीठ युवा रंगकर्मींसह प्रेक्षकांच्या आकर्षणाचे केंद्रबिंदू ठरत आहे. या स्पर्धेबाबत युवा रंगकर्मींमध्ये सुरुवातीपासूनच उत्साह पाहायला मिळाला असून उत्तरोत्तर ही स्पर्धा चुरशीची होत गेली. राज्यातील आठही केंद्रांवरील विभागीय अंतिम फेरी आणि महाअंतिम फेरीदरम्यान प्रेक्षकांच्या गर्दीने नाट्यगृह खचाखच भरून गेले होते. त्यामुळे दर्जेदार एकांकिकांची नाट्यपर्वणी पुन्हा अनुभवण्याची संधी प्रेक्षकांनी सोडली नाही.





## पर्यावरण दूतांचचे रायगड जिल्हाधिकाऱ्यांकडून कौतुक

दै.ठाणे जीवनदिप वार्ता
प्रतिनिधी ☐ पेण

११ देशांत पर्यावरण वाचवण्याचा संदेश देत तरुणांची चार लाख किमीची यात्रा उत्तर प्रदेशातील चार तरुणांनी ११ देशांमध्ये पायी यात्रा करत तब्बल ४.४८ लाख किलोमीटर इतका प्रवास करून ते गुजरातमार्गे पालघर, ठाणे,मुंबई येथून आज रायगड मध्ये प्रवेश केला.त्यांनी जिल्हाधिकारी किशन जावळे यांची भेट घेऊन या यात्रेची माहिती त्यांना दिली. पर्यावरण वाचवण्याचा वसा घेतलेल्या या तरुणांना ५.५ लाख किलोमीटरचा पल्ला गाठायचा आहे. आजपासून पाच दिवस रायगड वासीयांना पर्यावरण वाचवण्याचा संदेश देऊन हे ध्येयवादी तरुण पुढील प्रवास करणार आहेत.

२००१ पासून उत्तर प्रदेशातील जितेंद्र प्रताप, महेंद्र प्रताप, गोविंदा नंद आणि निश्चल मौर्य हे चार तरुण पायपीट करून जगभरातील नागरिकांना पर्यावरणाचे महत्त्व पटवून देण्यासाठी निघाले आहेत. त्यांची टीम आता २० सदस्यांपर्यंत पोहोचली आहे. ही टीम सध्या महाराष्ट्राच्या विविध भागातून पादाक्रांत करत आहे. ५.५ लाख किलो मीटर पायी चालून लोकांना पर्यावरणाचे महत्त्व पटवून देण्याचे भीमकार्यात जराही खंड पडू द्यायचे नाही, असा मनोदय केल्याचे त्यांनी सांगितले.

१९८० पासून त्यांचे गुरू अवध बिहारी यांनी उत्तर प्रदेशातून सुरू केलेल्या पदयात्रेच्या माध्यमातून या तरुणांनी भारतात ६०० ठिकाणी १४.५० कोटी झाडे लावली आहेत. पर्यावरणाचे रक्षण करा, झाडे लावा, पृथ्वी वाचवा, नद्यांचे संरक्षण करा, मुली वाचवा-मुली शिकवा, रस्त्याची सुरक्षा, स्वच्छ भारत मिशन असे त्यांच्या जनजागृतीचा मुख्य उद्देश आहे.

१९८० मध्ये उत्तर प्रदेशात आलेल्या महापुरात त्यांच्या गुरूंना वडाच्या वृक्षाने आधार देऊन वाचवले होते. तेव्हापासून वृक्ष लागवड आणि पर्यावरण रक्षणाच्या प्रचारार्थ त्यांनी जगभरात पायी यात्रेला सुरुवात केली, त्यांच्या आवाहनाला साद देत हे तरुण ही यात्रा पुढे घेऊन जाणार आहेत. या तरुणांनी ११ देशांचा दौरा केला आहे.

## हाय सेक्युरिटी नंबरप्लेटसाठी मार्च अखेरपर्यंत नोंदणी करावी

### - उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांचे आवाहन

दैनिक ठाणे जीवनदिप वार्ता
पेण ☐ प्रतिनिधी

केंद्रीय मोटार वाहन नियम, १९८९ च्या नियम ५० नुसार वाहनांस बसविण्यची तरतूद आहे. तसेच रस्ते व महामार्ग मंत्रालय नवी दिल्ली यांच्या जीसएआ ११६२ (HSRP) दि. ०१.१२.२०१८ व दि. ०६.१२.२०१८ नुसार दिनांक ०१.०४.२०१९ पासून उत्पादित होणाऱ्या सर्व नवीन वाहनांना हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन नंबर प्लेट बसविण्याची तरतूद करण्यात आली आहे.



त्यानुसारदि.०१.०४.२०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या सर्व वाहनां HSRP व तिस-या नोंदणी चिन्हांचे स्टिकर लावणे याकरीता https://transport.maharashtra.gov.in/1035/Home या वेबसाईटवर सर्व वाहनधारकांनी दि.३१ मार्च २०२५ पूर्वी नोंदणी करावी, असे आवाहन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालयाकडून कनण्यात आले आहे.

तसेच दि.०१.०४.२०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या सर्व वाहनां HSRP व तिसऱ्या नोंदणी चिन्हांचे स्टिकर लावणे बंधनकारक करण्यात आले आहे. त्यानुसार प्रत्येक कार्यालयामध्ये आवश्यक असणाऱ्या किमान HSRP बवसविणाऱ्या केंद्राना मान्यता देण्यात आली आहे. सदर जुन्या वाहनांना HSRP बसविण्यासाठी परिवहन विभागाने तयार केलेल्या HSRP पोर्टलवर दि.३१ मार्च २०२५ पर्यंत नोंदणी करणे बंधनकारक करण्यात आले आहे. दि.०१.०४.२०१९ पूर्वी नोंदणीकृत मोटार वाहनांसाठी वर नमूद केलेल्या अधिकृत HSRP उत्पादकांकडून वाहनांवर बसविण्यात आलेले HSRP हेच केवळ वैध मानले जाईल आणि वाहन पोर्टलवर अद्ययावत केले जाईल. इतर कोणत्याही HSRP निर्मात्याकडून / पुरवठादारकडून बसविलेल्या HSRP मोटार वाहन कायदा आणि नियमांच्या तरतुदीनुसार कायदेशीर कारवाईसाठी पात्र असतील.

## आर.आर. अकॅडमीचे बॉक्सिंग स्पर्धेत सुयश

दै.ठाणे जीवनदिप वार्ता

**पेण :** नुकत्याच न्यु बॉम्बे सिटि स्कूल घणसोली नवि मुंबई येथे क्लब बॉक्सिंग चॅम्पियनशिप स्पर्धेचे आयोजन न्यु बॉम्बे सिटि स्कूल ने शाळेच्या ग्राऊंड वर केले होते ह्या स्पर्धेत पेण रायगड येथील आर.आर.म्हात्रे बॉक्सिंग अकॅडमी च्या खेळाडुनी रविंद्र म्हात्रे ह्यांच्या मार्गदर्शनाखाली स्पर्धेत सहभागी होऊन उत्तम खेळाचे प्रर्दशन करुन ४ गोल्ड मेडल ५ सिलव्हर मेडल



पटकाऊन स्पर्धा यशस्वी केली

ह्या स्पर्धेत सदफ पठाण गोल्ड मेडल, आर्यन म्हात्रे गोल्ड मेडल, स्मित म्हात्रे गोल्ड मेडल, अशरफ अलि गोल्ड मेडल, तसेच अऐेशा बेगम सिलव्हर मेडल, अनुज रणपिसे सिलव्हर मेडल, आयुष पाटील सिलव्हर मेडल, निशिगंध पाटील सिलव्हर मेडल, संस्कार यादव सिलव्हर मेडल पठकवण्यात यशस्वी झाले त्यांच्या ह्या विजया मुळे त्यांचे सर्वत्र कैतुक व अभिनंदन करण्यात येत आहे. ह्या स्पर्धेत विजयी झालेल्या खेळाडूंनचे युनायटेड चे अध्यक्ष डॉ. मंदार पनवेलकर सर ह्यानि पण कैतुक व अभिनंदन केले.

ह्या स्पर्धा यशस्वी करण्यासाठी शर्मिला पवार मॅडम, तसेच बॉक्सिंग कोच इमरान खान सर व न्यु बॉम्बे सिटी स्कूल च्या सर्व मॅनेजमेंट कमिटी ने मोलाचे सहकार्य केले व स्पर्धा यशस्वी केले.












## मुरबाड तालुक्यातील जलजिवन मिशन कासव गतीने

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
☐ दिलीप पवार

**मुरबाड :** केंद्र सरकारचा महत्वकांक्षी प्रकल्प असलेला जल जिवन मिशन योजना ही मार्च २०२५ पर्यंत पूर्ण करण्याचा उद्दिष्ट असून हर घर नळ हर घर जल म्हणजे देशाच्या ग्रामिण भागातील प्रत्येक व्यक्तीला ५४ लिटर पाणी देण्याचा या योजने मागिल महत्वाचा उद्देश असून प्रत्येक गाव, खेड्यात, वाडी वस्तीवर ही योजना कार्यान्वित होत आहे. ठाणे जिल्हातील मुरबाड तालुक्यात एकूण २०६ योजनांना प्रत्यक्ष मंजुरी असताना नोव्हेंबर २०२२ पासुन ते आजपर्यंत फक्त ३५ योजना पुर्ण झाल्याची माहिती मुरबाड पाणी पुरवठा उप अभियंता जगदिश बनकरी यांनी माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाच्या कार्यकर्ताना दिली आहे.

माहिती अधिकार महासंघाच्या कार्यकर्तानी तालुक्यातील जलजिवन मिशन योजनांची सविस्तर माहिती घेतली असता ही गंभीर बाब समोर आलीअसून धक्कादायक बाब म्हणजे काही गावच्या योजना कार्यारंभ आदेश नोव्हेंबर २०२२ चा मिळाला असतानाही सुरुच झाल्या नसून अनेक योजना या तांत्रिक बाबी म्हणजे पाण्याचा उद्भव नसणे, जलकुंभासाठी जागा न होने, पाईप लाईन टाकण्यास विरोध अशा अडचणीत अडकल्या असल्याने उर्वरित अपूर्ण योजना कधी पूर्ण होणार असा यक्ष प्रश्न समोर उभा टाकला असून तालुका तहानलेलाच राहणार असल्याची भिती व्यक्त होताना दिसत आहे. या सर्व गोष्टीला कामाचे टेंडर घेणारे ठेकेदार, सब ठेकेदार, संबंधित खात्याचे उप अभियंता, शाखा अभियंता जबाबदार असून यांच्यावर अजून पर्यंत कोणतीही कारवाई झाली नसल्याने काही ठिकाणच्या योजना बारगळल्या असल्याचे नागरिकांचे म्हणने असून पुर्ण झालेल्या ३५ योजनांची माहिती घेण्यासाठी माहिती अधिकार कार्यकर्ते संबधित गावांचा लवकरच दौरा करणार असल्याचे ठाणे जिल्हा अध्यक्ष शंकर वडवले, दिलीप पवार, संतोष राऊत, अनिल बांगर यांनी सांगितले.

## सराफा कामगार हत्या प्रकरणी एकाला अटक; दोघांचा शोध सुरू

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** दोन आठवड्यापूर्वी शहापुरातील एका सराफाच्या दुकानात काम करणाऱ्या कामगाराचा दरोडेखोरांनी केलेल्या गोळीबारात मृत्यू झाला होता. याबाबत कोणतेही धागेदोरे नसताना केवळ खबऱ्यांकडून मिळालेल्या माहितीवरून प्रत्यक्ष गोळीबार करणाऱ्यास पोलिसांनी उत्तरप्रदेश येथून मोठ्या शिताफीने अटक केले. या गुन्ह्यातील दोन फरार आरोपींना लवकरच अटक करण्यात येईल असे पोलिसांकडून सांगण्यात आले. या प्रकरणी व्यापाऱ्यांनी दुकाने बंद ठेवून निषेध व्यक्त केला होता. आरोपींनी कोणताच पुरावा मागे सोडला नसल्यामुळे गुन्ह्याची उकल करणे, हे पोलिसांपुढे आव्हान होते. या गुन्ह्यातील आरोपींचा शोध घेण्यासाठी ठाणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक डी. एस. स्वामी यांनी ७० अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची एकूण १४ पथके तयार केली होती.



## कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

दुरध्वनी क्र. ०२५१-२२०३६२१

### उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभाग

-: नोटीस :-

कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील खालील नमूद अर्जदाराने विकास कामात बाधित होणारी झाडे तोडणे/पुनर्रोपण करणेस परवानगी मागीतली आहे.

| अनु. | अर्जदाराचे नाव | झाडे तोडावयाचे ठिकाण | बाधीत झाडांची संख्या | झाडे तोडण्याचे कारण |
|---|---|---|---|---|
| १ | कार्यकारी अभियंता, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, वांद्रे, मुंबई - ५१ | मोठागाव ब्रिज ते गोविंदवाडी पर्यंत चॅनेज ०७+००० कि.मी. ते चॅनेज १२+८६० कि.मी. | १११० | रिंगरोडचे कामात बाधित होत असल्याने |

सदरची झाडे तोडण्यास / पुनर्रोपणास परवानगी देणे अगोदर कोणाच्या काही हरकती असल्यास त्या महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ चे कलम ८ (३) अन्वये मागविण्यात येत आहेत. तरी कोणाच्या हरकती असल्यास ७ दिवसांच्या आत उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागात लेखी स्वरूपात योग्य त्या कागदपत्रांसह देण्यात याव्यात.

मुदतीत हरकती न आल्यास सदरची झाडे तोडणे/पुनर्रोपण करणेस वरील अधिनियमानुसार सशर्त परवानगी देणेबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

सही /-

जावक क्रमांक :-
कडोंमपा/जसंवि/मुका/१८
दि.०३/०१/२०२५

(संजय जाधव)
वृक्ष अधिकारी, वृक्ष प्राधिकरण विभाग
कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण


## शहापूर ग्रामपंचायत अधिकाऱ्यास लाच घेताना रंगेहात पकडले

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** जिल्ह्यातील शहापूर येथील वरस्कोळ ग्रुप ग्रामपंचायतचे ग्रामपंचायत अधिकारी सुरेश गणेश राठोड यांना ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने तीन हजारांची लाच घेताना रंगेहात पकडले. प्रलंबित कामासंदर्भात पत्र देण्याकरिता लाचेची रक्कम स्विकारल्याचा त्यांच्यावर आरोप आहे. शहापूर येथील पंडित नाका परिसरात सुरेश गणेश राठोड (४१) हे राहतात. ते शहापूर येथील वरस्कोळ ग्रुप ग्रामपंचायतमध्ये ग्रामपंचायत अधिकारी म्हणून काम पाहतात. तक्रारदाराला प्रलंबित कामासंदर्भात पत्र देण्याकरिता सुरेश यांनी त्याच्याकडे ५ हजार रुपयांची मागणी केली. याबाबत तक्रारदाराने ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे १ जानेवारीला तक्रार नोंदविली. त्याआधारे पोलिस अधिक्षक शिवराज पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांच्या पथकाने २ जानेवारीला तक्रारीची पडताळणी केली.त्यामध्ये प्रलंबित कामासंदर्भात पत्र देण्यासाठी सुरेश यांनी ५ हजारांची मागणी करून तडजोडीअंती तीन हजाराची रक्कम स्विकारण्याचे मान्य केल्याचे समोर आले. यानंतर ३ जानेवारीला पोलिसांच्या पथकाने सापळा रचून सुरेश यांना तक्रारदाराकडून तीन हजारांची लाच स्विकारताना रंगेहात पकडले, अशी माहिती ठाणे लाच प्रतिबंधक विभागाने दिली.